# .महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २९/०३/२०१७ रोजी सायंकाळी ०४.३० वाजता आयोजित केलेल्या २७० व्या बैठकीचे कार्यवृत्त

---

**बाब क्रमांक २७०/१**

**विषय :- प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत प्रकल्प सादर करणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७३१** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत खालील नमूद तक्त्यात दर्शविल्यानुसार योजनांच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | निम्नतम निविदाकाराचे नाव | वाटाघाटीनंतर सादर केलेला दर प्रति चौ.मी. | वाटाघाटीनंतरच्या दराप्रमाणे प्रकल्पाची संभाव्य रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|
| | **कोंकण मंडळ** | | | |
| १. | स.क्र.१३, मौजे भंडार्ली, ता. जि-ठाणे | मे. बी.जी. शिर्के कं. टे. प्रा. लि. | रु. २२,३८०/- | रु. २६४,६४.९९ |
| २. | स. क्र.८०, ९१, मौजा- भंडार्ली, ता.जि- ठाणे | मे. बी.जी. शिर्के कं. टे. प्रा. लि. | रु. २२,३८०/- | रु. ८०,०५.२२ |
| ३. | स.क्र. १५७, मौजे- गोठेघर, ता. जि - ठाणे | मे. बी.जी. शिर्के कं. टे. प्रा. लि. | रु. २२,१५०/- | रु. ४७९,९५.६९ |
| ४. | स. क्र. १६२, मौजे - खोणी, ता-कल्याण, जि-ठाणे. | मे. बी.जी. शिर्के कं. टे. प्रा. लि. | रु. २१,२०५/- | रु. ९१९,८४.९२ |
| ५. | स. क्र. ८६, ९५, १३३, मौजे-शिरढोण, ता-कल्याण, जि-ठाणे. | मे. बी.जी. शिर्के कं. टे. प्रा. लि. | रु. २०,७६३/- | रु. १५३४,६४.२२ |
| | **नाशिक मंडळ** | | | |
| ६. | गट क्र.१५६०, आडगांव, नाशिक | मे. वसंत कं. कं. इंडिया | रु. १५,९९१/- | रु. ३०१६.१८ |
| | **औरंगाबाद मंडळ** | | | |
| ७. | स. क्र.७८८ (भाग), जालना. | मे. वंडर कन्स्ट्रक्शनस | रु. १३,७७२/- | रु. २०४१.८० |
| ८. | स. क्र..९, नक्षत्रवाडी | मे. लक्ष्मी कंन्स्ट्रक्शन कं. | रु. १४,४९४/- | रु. २११८.०९ |
| १०. | अतिरिक्त एमआयडीसी प्लॉट क्र.१, लातूर | मे. पन्धे इन्फ्राकोन्स प्रा. लि. | रु. १४,२८४/- | रु. ६००७.३७ |
| | **नागपूर मंडळ** | | | |
| ११. | स. क्र. ४६, ४९, मौजे-चिखली देवस्थान, नागपूर | मे. बी.जी. शिर्के कं. टे. प्रा. लि. | रु. २३,८६०/- | रु. ६३६६.४४ |
| १२. | मौजे-पिंपळगाव, ता-हिंगणघाट. | मे. ईगल इन्फ्रा इं. लि., उल्हासनगर | रु. १५,७५०/- | रु. ३६१०.५२ |
| | **अमरावती मंडळ** | | | |
| १३. | अकोली, अमरावती | मे. डी. व्ही. प्रोजेक्ट लि, भोपाळ, मध्यप्रदेश | रु. १६,२२६/- | रु. ११९,४२.२५ |
| १४. | स.क्र.५२/१, ५३/२, ३, ४, ५, बुलढाणा, ता. जि- बुलढाणा | स्पेक्ट्रम इन्फ्रा. नाशिक | रु. १४,९७०/- | रु. २२,७०.४८ |

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/३**

**विषय :- मुंबईतील गोरेगावमधील मोतीलाल नगरच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी प्रकल्प नियोजन सल्लागार नेमणेबाबत.**

**-----------------------------------------------**

**आधिचा ठराव**

**ठराव क्रमांक : ६७३२** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मोतीलाल नगर १,२,३ गोरेगाव येथील ५७.६९ हेक्टर जमिनीवरील चाळीच्या पुनर्विकासाचे काम करण्यासाठी प्रकल्प नियोजन सल्लागार [PMC] नेमणेबाबत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. वरील कामाची प्रथम ई-निविदा जून २०१५ मध्ये मागविण्यात आली असता, प्रतिसाद न मिळाल्याने दुसरी ई-निविदा ऑक्टोंबर २०१५ मध्ये व्यापक प्रमाणात काढण्यात आली होती. त्यास अनुसरुन दोन निविदाधारकांनी निविदा भरल्या होत्या.

मा. उच्च न्यायालयात प्रलंबित याचिके अंतर्गत पी.एम.सी. नेमणुकीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे, असे शपथपत्र म्हाडाव्दारे सादर केलेले असून व त्यांची अंमलबजावणी त्वरीत करणे गरजेचे असल्याने मे. संदिप शिक्रे आणि असोसिएटस् व मे. देवधर असोसिएटस् या दोन सल्लागारांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफे तातडीने उघडण्यात आले. त्या तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांचे निविदेत नमूद केलेल्या निकषानुसार मुल्यमापन करण्यात आले व दोन्ही निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र ठरले. तद्नंतर त्या दोन्ही निविदाकारांनी भरलेले आर्थिक लिफाफे उघडण्यात आले. न्यूनतम निविदाधारक मे. संदिप शिक्रे आणि असोसिएटस् यांनी भरलेली रु. २५,५८,६१,०००/- निविदा रक्कम सक्षम प्राधिकारी स्तरावरुन वाटाघाटी करुन ३.५०% नी कमी केली आहे. ई-निविदेची मुदत संपत [validity] असल्या कारणाने तांत्रिक अडचण निर्माण होऊ नये याचा विचार करुन मे. संदिप शिक्रे आणि असोसिएटस् यांना प्राधिकरणाच्या कार्यात्तर मान्यतेस अधिन राहून मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या आदेशान्वये स्विकृतीपत्र (LOI) देण्यात आले.

निविदा स्विकृतीबाबतची कार्यवाही महाराष्ट्रसार्वजनिक बांधकाम नियमावलीतील [PWD Manual] परिच्छेद क्र. २०८ मधील कलम २ [अ] व २ [ब] नुसार केलेली असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे.

मोतीलाल नगर येथील प्रकल्पासाठी निम्नतम निविदाकारासोबतच्या वाटाघाटीची रक्कम हा दर प्रकल्प किमतीच्या ०.३६१% असल्याने सदर निविदेचा दर हा वाजवी असल्याने मे. संदिप शिक्रे आणि असोसिएटस् यांना मोतीलाल नगर १,२,३ गोरेगाव येथील ५७.६९ हेक्टर जमिनीवरील पुनर्विकासाच्या कामासाठी सल्लागार म्हणून नेमण्यास व त्यासाठीच्या रु. २४,६९,०५,८६५/- मोबदल्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>च्या ऐवजी सुधारित ठराव</u>**

**ठराव क्रमांक : ६७३२** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मोतीलाल नगर १,२,३ गोरेगाव येथील ५७.६९ हेक्टर जमिनीवरील चाळीच्या पुनर्विकासाचे काम करण्यासाठी प्रकल्प नियोजन सल्लागार [PMC] नेमणेबाबत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रियेमध्ये पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने ई निविदेस वाढीव कालावधी न दिल्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन प्रकल्प नियोजन सल्लागार नेमणेकरिता फेर निविदा काढण्यात यावी, या निर्णयास प्राधिकरणाने मान्यता दिली.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/४**

**विषय :- नविन चंद्रपूर-मौजा कोसारा सर्व्हे क्र.१५१,१५२,१५४ एकूण आरजी ११.३९ हेक्टर आर तसेच स.नं.१४७ (भाग), १५० (भाग) १५७ (भाग) असे एकूण अंदाजे क्षेत्र १७.०० हे.आर.या जमीन जागेवरील आरक्षण बदलाबद्दल.**

---

**ठराव क्रमांक : ६७३३** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नविन चंद्रपूर-मौजा कोसारा सर्व्हे क्र.१५१,१५२,१५४ एकूण आरजी ११.३९ हेक्टर आर तसेच स.नं.१४७ (भाग), १५० (भाग) १५७ (भाग) असे एकूण अंदाजे क्षेत्र १७.०० हे.आर. जमीन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करुन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्याकरिता फेरबदलाचा प्रस्ताव सादर करण्यासाठी वैधानिक स्वरुपाची कार्यवाही सुरु करण्यास्तव शासनाचे प्रधान मुख्य वन रक्षक व महा संचालक, सामाजिक वनिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-१/योजना/प्र.क्र.-९०/५१६/२०१५-१६, दिनांक ४/०६/२०१६ अन्वये सचिव (वने ), महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव पाठविल्यानुसार सदर पत्राचे आधारे सचिव ( वने ), महाराष्ट्र शासन यांचे नाहरकतीस अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/५**

**विषय :- म्हाडाने कांदिवली शिंपोली येथील विभागीय क्रिडा संकुलासाठी हस्तांतरीत केलेला भूखंड नाममात्र भाडे पट्टाने देण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७३४** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मौजे कांदिवली येथील न.भू.क्र. १-सी/१/१ या ४८७६७.८७ चौ.मी. क्षेत्रफळाचा म्हाडाचा आर.जी.साठी राखीव भूखंड विभागीय क्रिडा संकुल उभारण्यासाठी नाममात्र दराने देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीकरिता शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/७**

**विषय :- जिल्हा स्त्री रुग्णालयाचे बांधकामाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७३५** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ताब्यात असलेल्या मौजा शहापूर ता.जि. भंडारा येथील स.क्र. ३०७ शिट क्र. ५७ भूखंड क्र. ३ मधील एकंदर ४९००.०० चौ.मी. जमिनीपैकी जिल्हा स्त्री रूग्णालयास पोहचमार्गाकरिता अत्यावश्यक असल्याने १००.०० चौ.मी. जागा महसूल विभागास प्रत्यार्पित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/८**

**विषय :- वेरुळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव २०१६ चे आयोजनात आर्थिक सहकार्य करणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७३६** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद येथे आयोजित दिनांक १४, १५ व १६ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या वेरुळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सवास विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे दिनांक २४/०८/२०१६ च्या अर्धशासकीय पत्रातील विनंतीनुसार आर्थिक मदत म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे रु. १५.०० लक्ष निधी "वेरुळ-अजिंठा महोत्सवास " देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/९**

**विषय :- मुंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशन व म्हाडा कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत वितरीत केलेल्या भूखंडावर बांधलेल्या इमारतीतील सदनिकांचे हस्तांतरण / नियमितीकरण करण्याकरिता मुख्य अधिकारी / मुं.मं. यांना प्राप्त असलेले अधिकारी सहमुख्य अधिकारी / मुं.मं. यांना प्रदान करणे बाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७३७** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशन व म्हाडा कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत वितरीत केलेल्या भूखंडावर बांधलेल्या इमारतीतील सदनिकांचे हस्तांतरण / नियमितीकरण करण्याचे मुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना प्राप्त असलेले अधिकार सहमुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना प्रदान करणेच्या कार्योत्तर मंजूरीस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/१०**

**विषय :- नायगांव, ना.मं.जोशी मार्ग-परळ, शिवडी व वरळी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाबाबत बाब टिपणी.**

**------------------------------------------------**

**ठराव क्रमांक : ६७३८** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नायगांव, ना.म.जोशी मार्ग, वरळी व शिवडी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पात संक्रमण शिबीरावर होणारा मासिक खर्च रहिवाश्यांकडून न घेता, प्रकल्प खर्चात सदर खर्च समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २७०/१२**

**विषय : मुंबई मंडळांतर्गत विविध योजनेतील गाळेधारकांकडून / संस्थेकडून वसूल करायच्या थकित सेवाशुल्क / सुधारीत सेवा शुल्काची वसूली व त्यावरील व्याजाबाबत अभय योजना.**

---

## आधिचा ठराव

**ठराव क्रमांक : ६७३९** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत विविध योजनेतील गाळेधारकांकडून/ संस्थेकडून वसूल करायच्या थकित सेवाशुल्क / सुधारीत दराने वसूल करावयाच्या थकित सेवा शुल्काची वसूली व त्यावरील व्याजाबाबत अंमलात आणावयाची "अभय योजना " पुढीलप्रमाणे राहील.

अ) आर्थिक वर्ष सन १९९८ ते २०१६ या कालावधीसाठी सुधारीत दराने देय थकित सेवाशुल्काची वसूली आर्थिक वर्ष २०१७ ते २०१९ या २ वर्षात समान चार हप्त्यात (सहामाही) करावी.

ब) वरील "अ" प्रमाणे विहीत मुदतीत सन १९९८ ते २०१६ पर्यंतच्या सुधारीत दराच्या मूळ (थकित रकमेसह ) सेवा शुल्काचा भरणा केल्यास संबंधितांना त्यांच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज सदर अभय योजनेअंतर्गत माफ करण्यात यावे.

क) प्राधिकरण ठराव क्र.५८८२, दिनांक २०/०२/२००३ अन्वये, लाभार्थीकडून गाळयाच्या सेवा शुल्काच्या थकबाकीच्या वसूलीसाठी आकारण्यात येत असलेले डिलेड पेमेन्ट चार्झेस (विलंबनात प्रदान आकार ) हा १.५% दरमहा म्हणजेच वार्षिक १८% आकारण्यात येत आहे व वाणिज्य गाळयासाठी हा दर २% दरमहा आकारण्यात येत आहे. सद्यस्थितीत बँकेच दर कमी झालेले आहेत. त्यामुळे सदरचा डिलेड पेमेन्ट चार्झेस (विलंबनात प्रदान आकार) हा १% दरमहा व वाणिज्य गाळयासाठी १.५% करण्यात यावा.

ड) सदर अभय योजनेअंतर्गत सेवाशुल्काच्या थकबाकीचा भरणा वरीलप्रमाणे विहीत मुदतीत ( सहामाही हप्त्याच्या मुदतीत ) केला नाही तर सदर थकबाकीवर वरीलप्रमाणे सुधारीत डिलेड पेमेन्ट चार्जेस (विलंबनात प्रदान आकार) आकारण्यात यावेत.

इ) यापुढे सदर सुधारित डिलेड पेमेन्ट चार्जेस ( विलंबनात प्रदान आकार ) म्हाडाच्या सर्व मंडळांना लागू करण्यात यावा.

वरील अभय योजनेचा लाभ हा ज्या संस्था अभिहस्तांतरण करतील त्याच संस्थांना देण्यात यावा, व सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनंतरच लागू करण्यात यावा यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## च्या ऐवजी सुधारित ठराव

**ठराव क्रमांक : ६७३९** **दिनांक : २९/०३/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत विविध योजनेतील गाळेधारकांकडून/ संस्थेकडून वसूल करायच्या थकित सेवाशुल्क / सुधारीत दराने वसूल करावयाच्या थकित सेवा शुल्काची वसूली व त्यावरील व्याजाबाबत अंमलात आणावयाची "अभय योजना " पुढीलप्रमाणे राहील.

अ) आर्थिक वर्ष सन १९९८ ते २०१६ या कालावधीसाठी सुधारीत दराने देय थकित सेवाशुल्काची वसूली आर्थिक वर्ष २०१७ ते २०१९ या २ वर्षात समान चार हप्त्यात (सहामाही) करावी.

ब) वरील "अ" प्रमाणे विहीत मुदतीत सन १९९८ ते २०१६ पर्यंतच्या सुधारीत दराच्या मूळ (थकित रकमेसह ) सेवा शुल्काचा भरणा केल्यास संबंधितांना त्यांच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज सदर अभय योजनेअंतर्गत माफ करण्यात यावे.

क) प्राधिकरण ठराव क्र.५८८२, दिनांक २०/०२/२००३ अन्वये, लाभार्थीकडून गाळयाच्या सेवा शुल्काच्या थकबाकीच्या वसूलीसाठी आकारण्यात येत असलेले डिलेड पेमेन्ट चार्जेस (विलंबनात प्रदान आकार ) हा १.५% दरमहा म्हणजेच वार्षिक १८% आकारण्यात येत आहे व वाणिज्य गाळयासाठी हा दर २% दरमहा आकारण्यात येत आहे. सद्यस्थितीत बँकेच दर कमी झालेले आहेत. त्यामुळे सदरचा डिलेड पेमेन्ट चार्जेस (विलंबनात प्रदान आकार) हा १% दरमहा व वाणिज्य गाळयासाठी १.५% करण्यात यावा.

ड) सदर अभय योजनेअंतर्गत सेवाशुल्काच्या थकबाकीचा भरणा वरीलप्रमाणे विहीत मुदतीत ( सहामाही हप्त्याच्या मुदतीत ) केला नाही तर सदर थकबाकीवर वरीलप्रमाणे सुधारीत डिलेड पेमेन्ट चार्जेस (विलंबनात प्रदान आकार) आकारण्यात यावेत.

इ) यापुढे सदर सुधारित डिलेड पेमेन्ट चार्जेस ( विलंबनात प्रदान आकार ) म्हाडाच्या सर्व मंडळांना लागू करण्यात यावा.

वरील अभय योजना प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनंतरच लागू करण्यात यावा, यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय :- स.व्र.१२(भाग), मौजे-तळेगाव दाभाडे, ता.मावळ,**
**जि.पुणे येथील या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत**
**७६० अत्यल्प उत्पन्न गट सदनिका बांधण्याच्या कामांच्या**
**निविदांची स्वीकृती करण्याबाबत.**
**-----------------------------------------------------**

**ठराव क्रमांक : ६७४०** **दि.०५/०४/२०१७**
**दि. २५/०४/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे नं.१२ (पै) मौजे तळेगाव तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ७६० अत्यल्प उत्पन्न गट सदनिका बांधण्याचे कामाच्या निविदांची स्वीकृती करण्याबातच्या योजनाच्या प्रस्तावास खालील नमूद तक्यात दर्शविल्यानुसार प्राधिकरण मान्यता देत आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | निम्नतम निविदाकाराचे नाव | वाटाघाटीनंतर सादर केलेला दर प्रति चौ.मी. | वाटाघाटी नंतरच्या दराप्रमाणे प्रकल्पाची संभाव्य रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १. | सर्व्हे नं.१२ (पै) मौजे तळेगाव तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ७६० अत्यल्प उत्पन्न गट सदनिका बांधण्याचे काम | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. | रु. १९०४९/- | रु. ५९७९.४८ |

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.